आपण हा लेख www.maanavta.com या अध्यात्मिक वेबसाईट वर वाचत आहात.

संपादकीय

मुळाशी एकनिष्ठ रहा - नेहमी

लेखक — श्री. राम कुमार 'सेवक' जी मुख्य संपादक — www.maanavta.com

वसंत ऋतू, चोहो बाजुला सुंदरता, मन मोहुन टाकणारे विलोभणीय वातावरण, होळी सणाच्या पर्वावर वसंत ऋतुचे जाणे आणि ग्रीष्माच्या आगमनाची वर्दी सगळीकडे पानझड, वातावरणात धुळीचे साम्राज्य, एका गीतकाराने लिहले आहे.

पतझड, सावन, बसन्त बहार,
एक बरस के मौसम चार..... मौसम चार

विचारपुर्वक बघितल तर लक्षात येत की, गीतकाराने फक्त तीन ऋतूंचाच उल्लेख केलेला वाटतो. पानझड (ग्रिष्म) सावन (शरद) आणि बसन्त (वसंत) वर्षा ऋतुचा कुठे मागसुस दिसत नाही खरे म्हणजे वर्षा ऋतुमुळेच आम्हाला पाणी उपलब्ध होते, आणि दुसऱ्या शब्दात सांगायचे तर पाणी हेच जीवन ! आपला यमक साधण्यासाठी गीतकाराने 'बहार' या शब्दाला बरसात (वर्षा) ऐवजी योजिलेलं दिसतय.

एका भक्ताने लिहले आहे

जिस ठाकुर से नाहीं चारा
ताको किजे सद नमस्कारा

महात्मा म्हणतात, ज्याचे तुम्ही काही बिघडवु शकत नाही, त्याला शरण येणच योग्य आहे. सांगण्याचा भावार्थ इतकाच की, कुणी आपल्याला अनुकूल नसेल आणि तुम्ही त्याला आपल्या अनुसार करू शकत नसाल तर स्वत:स त्याच्या अनुसार बदलवुन घ्या. ज्या प्रमाणे आम्ही पाऊसाला आमच्या इच्छानुरूप चालु अथवा बंद करण्यासाठी संघर्ष न करता, स्वत:चे रक्षण करण्याचा प्रयत्न करतो — छत्रीच्या साहयाने. पाऊस हा विधानानुसार आपल काम करितच असतो मग कुणाचे भले घर—दार वाहुन जावो. ते तर पाऊसाच्या आक्रमकतेच छोटस उदाहरणच ठरेल. तसेच जीवनात चढ—उतार नेहमी येतच राहतात, कधी खुप आनंदी आनंद तर कधी दुखाचा डोंगर कधी वसंत तर कधी ग्रीष्म माया चे रहस्य कधी कुणाला कळाले? कधी उतुंग यशाच्या

शिखरांना काबीज करू तर कधी दुखाच्या खोल खाईत लोटले जावु. याकरीताच कबीर दासजींना म्हणावं लागलं.

''माया महाठगिनी हम जानी''।

विचाराची गोष्ट इतकीच आहे की, काय ऋतामानासारखे माया समोर आम्ही नतमस्तक होवुन जावे? ठगांना नमस्कार करण्याची आवश्यकता नाही, आवश्यकता आहे जागरूकतेची. ना वसंत कायम आहे ना ग्रीष्म, दोघे तर जातीलच मग कशाला चिंता करायची? आवश्यकता आहे समन्वय साधण्याची.

बांबुची झाडे जोराने वाहणाऱ्या हवेशी संघर्ष करून स्वत: जमिनीतुन उपटले जातात, पण इवलीशी गवताची पाती हवेशी समन्वय साधून तग धरून राहते, प्रत्येकाचा आपला आपला स्वभाव आहे.

महत्मा सत्संगमध्ये विचारभाव व्यक्त करतांना म्हटले की, ''हा क्षण सुध्दा निघुन जाईल'' एक सज्जनांच्या कानी फक्त हेच वाक्य पडले, तो घरी गेला, घरात बांधकाम चालु होते. अचानक नवीन बांधलेली भिंत कोसळली. नविन उभारलेली भिंत कोसळल्यामुळे त्या सज्जनाचे मन दु:खी झाले, तोच त्याला महात्म्यांचे वाक्य आठवले ''हा क्षण सुध्दा निघून जाईल'' त्यांच दु:ख समाप्त झाल, हा विचार करून की काय हरकत आहे, ही भिंत तर पडणारच होती म्हणुन पडली, पुन्हा बांधली जाईल, व्यर्थ चिंता का करावयाची.

सर्व काही परिवर्तनशील आहे, बालक युवावस्था प्राप्त करत आहेत, युवक प्रौढ होत आहे. प्रौढ वृध्दावस्थेकडे झुकत आहेत. युवा अवस्थेत ज्या गोष्टी योग्य वाटतात त्याच गोष्टी प्रौढाअवस्थेत अयोग्य वाटतात. युवाअवस्थेत प्रेम, विवाह आकर्षण या गोष्टी हव्या–हव्याशा वाटतात तर त्याच गोष्टी जर कुणा तरूणाने प्रौढावस्थेत आमच्याशी केली तर त्या आम्हास असन्माननीय वाटतात. कारण काळचक्राचा फरक आहे, विचार बदलत आहेत, परंपरा बदलत आहे, जीवन बदलत आहे.

जीवनात जर आता पानझड (दुख) आहे तर भीतीची आवश्यकता नाही, आवश्यकता आहे ती फक्त ''मुळांशी'' एकनिष्ठ राहण्याची जीवनात नवीन पालवी (सुख) निश्चित फुलून येईल.

परीक्षेत प्रश्नपत्रिका सोपी असो वा कठीण दृढतेपुर्वक सामोरे जा. त्याचा परिणाम दोन रूपामध्ये आम्हाला पहावयास मिळेल यश किंवा अपयश. यशासाठी तर हजारो समर्थक भेटतील पण अपयशासाठी कुणीही सोबती नसतो, हया काही नवीन गोष्टी

नाहीत. अपयश काही कामय राहणार नाही. जो कुणी आज अपयशी आहे तो उद्या अनेक यशस्वी लोकांपेक्षा पुढे यशोशिखरावर असेल. या विषयी अब्राहम लिंकन यांचे जीवन प्रेरणादायी वाटते. त्यांच्या जिवनात अनेक चढ–उतार आले पण ते डगमगले नाही. आपल्या संकल्पांवर दुढ राहीले. कुठलाही शास्त्रज्ञ एकाच प्रयोगात यशस्वी होत नाही, तर तो दृढतेने आपले प्रयोग चालुच ठेवतो, त्यावर कुठे त्यास यशा प्राप्ती होते. अपयशात ही दृढता ठेवुन तो यश प्राप्त करतो.

माझ्या जीवनात ही अपयशाचा काळ आला होता. ज्यावेळी चहुबाजुने संकटांनी घेरले होते, परंतु निरंकार (परमात्मा) त्यावेळी ही सोबत होता. भुकेल्या पोटी त्यावेळी ही झोपलो नाही, अंग झाकायला हातभर कपडे त्यावेळी ही होतेच. हळु हळु ते दिवस सुध्दा निघुन गेले.

वेळ–काळ अनुकूल – प्रतीकूल होत राहणार. एका नावाडयासारखे, नौकेला वारा आणि लाटांच्या अनुरूप दिशा द्यावी लागेल, जेणेकरून नौका डुबणार नाही. सकाळी उद्यानातुन बाहेर आलो तर रस्त्यावर सर्वत्र पानांचा खच पडला होता, मित्राशी चर्चा झाली तर ते म्हणाले हा प्रभाव वातावरणाचा आहे. काल वसंत होता आज पानझड आहे. पानझडी नंतर पावसाळा (वर्षा) निश्चितच येईल. मी म्हटले खरयं, पण आवश्यकता आहे ती मुळांशी एकनिष्ठ राहण्याची. जर मुळांपासुन वेगळे झालो तर कोमजणे निश्चितच आहे.

आमचे मुळ अध्यात्माशी एकरूप आहे कारण आम्ही ''आत्मा'' आहोत, शरीर मात्र आत्माचे निवासस्थान आहे.

मन आणि बुध्दीस अध्यात्माशी जोडून ठेवा, आणी निष्ठेने आपल्या कर्तव्याचे पालन करा मग तुम्हास कुणीही हरवु शकत नाही, चांगला खेळं खेळणे, नेहमी प्रशंसेच कारण बनंत, मग तुम्ही हारो अथवा जिंको. चांगला खेळाडु नेहमी विजेताच असतो भले त्याचं नांव कुठे प्रकाशीत होवो वा ना होवो. हा दुढ विश्वास ठेवा की, प्रामाणिकपणे केलेल्या कर्मास निश्चित यश मिळत कारणं परमात्मा निर्दयी नाही, आणि ज्यावेळी कुणीही साथ देत नाही, त्यावेळीही हा परमात्माच साथ देतो तथा सोबत असतो, आणि या वास्तवतेचं भान ठेवने यालाच ''अध्यात्म'' म्हणतात, फक्त आवश्यकता आहे आम्हास अध्यात्माशी एकनिष्ठ राहवयाची, मुळाशी एकनिष्ठ रहावयाची.

राम कुमार 'सेवक'
rksewak@yahoo.co.in

अनुवादक
सुकदेव पाटील
sukdeo_behere@yahoo.co.in